**लष्कर पोलीस स्टेशन कडील चांगल्या कामगीरीची माहीती – दि.२६/०५/२०१९**

लष्कर पोलीसांची सतर्कता व रिक्षाचालकाच्या प्रामाणिकपणामुळे सोन्याचे दागिणे व रोख रक्कम असलेली बॅग महिलेला परत **केले बाबत..**

पुणे कॅम्पः आज दि. २१ मे २०१९ रोजी दु.१२ वाजता सौ.रुपाली निशांत रोहनकर (रा. गोंधळेनगर, हडपसर, पुणे ) या आपल्या कामानिमित्त लष्कर भागातील महात्मा गांधी रस्ता येथे ऑटो रिक्षाकरुन आल्या होत्या. गडबडीत त्या आपली बॅग रिक्षा मध्येच विसरल्या. सदर बॅगेत अडीच तोळे सोन्याचे दागिणे, रोख तीन हजार रुपये व इतर कागदपत्रे असल्याने सौ.रोहनकर यांनी लष्कर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या सेंटर स्ट्रीट चौकी येथे जाऊन पोलीसांना सदर प्रकार सांगून रिक्षाचालकाचे वर्णन सांगितले. त्यानुसार लष्कर पो.ठाण्याचे वरिष्ठ पो.निरीक्षक चंद्रकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली लागलीच पोलीस शिपाई एस.ए.तांबोळी, सेंटर स्ट्रीट मार्शल एस.एस.कांबळे व श्री.सोयाम यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन सी.सी.टीव्ही कॅमे-याचा तपास करून शोध घेण्यास सुरुवात केली. तेव्हा ईस्ट स्ट्रीट कडून एम.जी.रोडकडे एक रिक्षा येताना पोलिसांना दिसली. तेव्हा रिक्षाचालक संजय अडसूळ (रिक्षा क्र.एम.एच.१२ /एन.डब्ल्यू.१९६८) यांच्या कडे रिक्षातील बॅगेसंदर्भात विचारले असता एक महिला बॅग विसरल्याचे सांगितले. त्यानुसार सौ.रोहनकर व अडसूळ यांची भेट घडवून दिली असता सौ.रोहनकर यांची बॅग असल्याचे निष्पन्न झाले. तेव्हा पोलीसांनी दोघांना चौकीत नेले व पोलीसांच्या समक्ष रिक्षाचालक अडसूळ यांच्या हस्ते सौ.रोहनकर यांना सदर बॅग सूपूर्द केली. यावेळी पोलीस हवालदार एस.डी.ऐक्के , पोलीस शिपाई एस.ए.तांबोळी,बीट मार्शल पो.शि. एस.एस.कांबळे, सोयाम ,महिला पो.शिपाई एल.पी.चव्हाण,कर्तव्य फाउंडेशनचे अध्यक्ष विकास भांबुरे , कार्याध्यक्ष अशोक देशमुख , उपाध्यक्ष गणेश शेलार आदी उपस्थित होते. रिक्षाचालक संजय अडसूळ यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणा बद्दल कर्तव्य फाउंडेशनतर्फे त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सौ.रोहनकर यांनी पोलीसांचे व रिक्षाचालक अडसूळ यांचे आभार मानले.

